12:49:21 नियमित दिवाणी दावा ०६/२०१८

दत्तात्रय रामचंद्र शेटे वि.भगवान तुकाराम शेटे
नि.नं. ५९/लगत / सी

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. एम. डी. कराडे वकील यांच्यामार्फत पुन्हा शपथेवर सुरु,**

१.हे म्हणणे खरे नाही की, वादी हे माझे नातेवाईक आहेत. मी प्रतिवादी यांच्या दावा मिळकत मालकी संबंधाने असेलेली कागदपत्रे पाहिलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतीही रक्कम दिलेली नाही. सदरची रक्कम दि. १०.०७.२०१७ रोजी ०३,०५,०००/– एवढी रक्कम देण्यात आलेली होती. सदरची रक्कम माझे समक्ष देण्यात आलेली होती. सदर रक्कमेचा तपशील मला सांगता येणार नाही. माझ्या सरतपासात दि. १०.०७.२०१७ रोजी रोख रक्कम दिल्याचा उल्लेख केलेला नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. दि.१०.०७.२०१७ रोजी झालेल्या कराराचा स्टॅम्प कोणी घेतला होता ते मला सांगता येणार नाही. सदरचा स्टॅम्प कोणी आणला होता ते मला सांगता येणार नाही.हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये जो व्यवहार होता तो माझे समक्षच पहिल्या प्रथम ठरला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्यानुसार पहिल्या प्रथम तो व्यवहार दि. १०.०७.२०१७ रोजी झाला होता. बोलणी किती वाजता झाली त्याचे टायमिंग मला सांगता येणार नाही. ज्या कराराबाबत मी साक्ष देत आहे त्या करारातील मजकूर कोणी टाइप केला ते मला सांगता येणार नाही. करारातील मजकूर टाइप केला त्यावेळी मी प्रत्यक्ष हजर नव्हतो. प्रताप जाधव यांच्या कार्यालयात मी गेलो नव्हतो. आजअखेर प्रताप जाधव यांचे कार्यालय मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील मजकूर हा वादीच्या वकिलांनी टाइप केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रताप जाधव वकिलांना कधीही पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष प्रताप जाधव वकिल साहेबांनी

कोणतेही काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रताप जाधव साहेब यांच्या ऑफीसमध्ये गेलो नसल्यामुळे नोटरी कोणी केली ते मला सांगता येणार नाही. रक्कम रु. ०३, ०५,०००/– ही एक रक्कमी माझे समक्ष देण्यात आलेली होती. सदरची रक्कम ही ०३, ०५, ०००/– आहेत किंवा कसे याची खातरजमा मी प्रत्यक्ष केली नव्हती. माझे समक्ष दत्तात्रय यांनी नोटा मोजल्या होत्या. सदर नोटा किती होत्या ते मी सांगू शकत नाही. माझ्या माहितीनुसार सदरच्या नोटा हजार रुपयांच्या होत्या. सदर नोटा हजारच्या किती होत्या ते मला आठवत नाही. माझ्या माहितीनुसार पाचशेच्या ज्यादा नोटा होत्या. माझ्या माहितीनुसार पाचशेच्या नोटा या हजार नोटांच्या तुलनेत तीन पट जास्त होत्या. हे म्हणणे खरे आहे की, काही नोटा हजारच्या दिल्या तर काही नोटा पाचशेच्या दिल्या. सदरच्या नोटा दत्तात्रय यांनी कोठून आणल्या होत्या ते मला माहीत नाही. दत्तात्रय यांनी मला सदरच्या नोटा कोठून काढल्या याबाबतचा तपशील सांगितला नव्हता. दि. ८ नोव्हेंबर २०१६ या दिवशी नोटाबंदी झाली होती किंवा कसे याची तारीख मला आठवत नाही. मला पेपर वाचायला वेळ मिळत नाही. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. मला कामाचा व्याप आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कामाच्या व्यापात बऱ्याच रक्कम माझ्याकडे येतात व बऱ्याच रक्कमा मला द्याव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०.०७.२०१७ रोजी हजार रुपयांच्या नोटा लोकांना देवून मी व्यवहार केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी दत्तात्रय यांचेसोबत न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे शपथपत्र मी न वाचता त्यावर मी सही केली. सदर शपथपत्र वाचल्यानंतर त्यातील मजकूर विसंगत असल्याचे मला जाणवले नाही.

प्रश्न –दि. १०.०७.२०१७ रोजी झालेल्या करारात दत्तात्रय यांनी त्या दिवशी रक्कम रु. ०३, ०५, ०००/– दिल्याचे शपथपत्रात नमूद नाही याचे कारण तुम्हाला सांगता येईल का ?

उत्तर – हे म्हणणे खरे आहे. कारण मला माहीत नाही.

२. मी करारावर त्याच दिवशी सही केली होती. सदर करारावर मी कोतोली येथे सही केली होती. सदर सही मी किती वाजता केली ते मला आठवत नाही. मी सही केली त्यावेळी कागद/करारपत्र घेवून कोण आले होते ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या व्यवहारातील काही माहीत नसताना आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

13:10:44

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/–**

दि. ०६/०३/२०२६.

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा